

देगलूर : देगलूर महाविद्यालयात आयोजित वक्तृत्व स्पर्धेत प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# देगलूर महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा

देगलूर,ता. २ः देगलूर महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग व फोरम ऑफ फ्री एंटरप्राईजेस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५७ वी श्री श्राफ स्मृती वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आर्थिक आणि संबंधित विषयावर विचार करण्यास आणि बोलण्यास प्रोत्साहन देण्याबरोबरच त्यांना त्यांची बोलण्याची क्षमता प्रदर्शित करण्यास सक्षम बनवता येईल, या उद्देशाने पदवी अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. प्रथम येणाऱ्यास अडीच हजार रुपये, द्वितीय येणाऱ्यास दीड हजार रुपये, तृतीय येणाऱ्यास एक हजार रुपये व सर्वोत्कृष्ट पाच स्पर्धकांना प्रमाणपत्र असे पारितोषिक देण्यात आले. सदरील वक्तृत्व स्पर्धेत प्रथम गायत्री सुर्यवंशी, द्वितीय योगेश झगळे, तृतीय संध्याराणी राचलवार या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. वक्तृत्व स्पर्धेचे पंच म्हणून डॉ. सुदाम लक्ष्मण, डॉ. माधव चोले, डॉ. सुरेश काशिदे यांनी काम पाहिले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, प्रा. उत्तमकुमार कांबळे उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner